PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Chhabidar Chhabi
Lyricist: Jagdish Khebudkar

अवं हे गाव लई न्यारं
हितं थंड गार वारं
ह्याला गरम शिणगार सोसंना
ह्याला गरम शिणगार सोसंना
ह्याचा आदर्शाचा तोरा
ह्याचा कागद हाय कोरा
हितं शाहिरी लेखणी पोचंना
हितं शाहिरी लेखणी पोचंना
हितं वरण भाताची गोडी रं
नको फुकट छेडाछेडी रं
का हो..
अरं सोंगा ढोंगाचा बाजार हिथला
साळसूद घालतोय अळीमिळी
अन् सार वरपती
रसा भुरकती
घरात पोळी अन् भायेर नळी
अरे वा हे बेस हाए की
अशा गावात तमाशा बरा
इश्काचा जरा पिचकारी भरा
उडू दे रंग
उडू दे रंग
उडू दे रंग
मखमली पडद्याच्या आत
पुनवेची रात
चांदणी न्हात
होवू दे दंग
होवू दे दंग
होवू दे दंग
होवू दे दंग

अगं चटक चांदणी
चतुर कामिनी
काय म्हनू तुला तू हायेस तरी कोन
कोण
व्हय व्हय कोण
छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
जशी चांदणी चमचम नभी
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
नवतीचं रान हे भवतीनं
फिरत आले मी गमतीनं
नवतीचं रान हे भवतीनं
फिरत आले मी गमतीनं
बांधावरनं चालू कशी
पाठलाग ह्यो टाळू कशी
अरं लाजमोड्या
भलत्याच करतोय खोड्या
हे वागणं बरं नव्हं
अरं लाजमोड्या
भलत्याच करतोय खोड्या
हे वागणं बरं नव्हं

PlanetRead

Literacy for a Billion

आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
डौल दावते मोराचा
तिरपा डोळा चोराचा
डौल दावते मोराचा
तिरपा डोळा चोराचा
वढ्याच्या काठाला आडिवतो
अंगावर पानी उडिवतो
अरं बजरंगा
नकोस घालू पिंगा
हे वागणं बरं नव्हं
अरं बजरंगा
नकोस घालू पिंगा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
हिरवी शेतं दरवळली
टपोरी कणसं मोहरली
हिरवी शेतं दरवळली
टपोरी कणसं मोहरली
शीळ घालूनी करतो खुणा
घडीघडीला चावटपणा
अरं मर्दा
अब्रुचा होईल खुर्दा
हे वागणं बरं नव्हं
अरं मर्दा
अब्रुचा होईल खुर्दा
हे वागणं बरं नव्हं

आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
मिरचीचा तोडा मी करते रं
वट्ट्यात ऐवज भरते रं
मिरचीचा तोडा मी करते रं
वट्ट्यात ऐवज भरते रं
पदर माझा धरतोस कसा
भवतीनं माझ्या फिरतोस कसा
अरं बत्ताशा
कशाला पिळतोस मिशा
हे वागणं बरं नव्हं
अरं बत्ताशा
कशाला पिळतोस मिशा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
छबीदार छबी मी तोऱ्यात उभी
जशी चांदणी चमचम नभी
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं
आवं दाजिबा
गावात होईल शोभा
हे वागणं बरं नव्हं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*